मुख्य संपादक
**विश्वनाथ जयसिंग पाटील**

संपादक
**डॉ.जया विश्वनाथ पाटील**

कार्यकारी संपादक
**श्रीकांत साताप्पा साठे**

उप संपादक
**पराग पुरोहित**

मुखपृष्ठ मांडणी
**रसिका सागवेकर**

मांडणी
**अपूर्वा शिंदे**

मुद्रितशोधन
**प्रज्ञा भोसले**

अभिप्राय, सूचना व मागणी
संपर्क
**'पृथ्वी पब्लिकेशन',**
**१५३६, सदाशिव पेठ, पुणे ३०.**
**: 8390554161**
: admin@prithvi.net.in

'यशाची परिक्रमा' हे मासिक मालक, 'पृथ्वी पब्लिकेशन' यांचेकरिता मुद्रक व प्रकाशक विश्वनाथ जयसिंग पाटील यांनी सकाळ मीडिया प्रा.लि.पुणे येथे छापून १५३६, सदाशिव पेठ, पुणे ४११०३० येथे प्रसिद्ध केले.

**नमस्कार,**

२०२० हे कोरोनाचे वर्ष ठरले. या वर्षाने आपल्याला संथ गतीमध्ये जायला भाग पाडले. विकासाच्या वारूवर स्वार झालेल्या आपणा सर्वांना आस्ते कदम चालायचे असते याचे भान आणून दिले. आपल्याला भानावर आणण्याची ही प्रक्रिया अजूनही सुरूच आहे. जे भानावर येतील त्यांच्याकडे बरेच काही नवीन असेल. जे भानावर आलेच नाहीत त्यांना पुन्हा कदाचित ही संधी मिळणार नाही. कोरोना आपत्तीच्या निम्मिताने ही संधी आपल्याला मिळाली आहे.

महाराष्ट्रातील स्पर्धा परीक्षांचे काय? हा सगळ्यांनाच त्रास देणारा प्रश्न आहे. अर्थातच त्याचे उत्तर विद्यार्थ्यांकडे नसून सरकार आणि व्यवस्थेकडे आहे. पण परीक्षा होणारच नाही असे मात्र नाही. ती तर नक्कीच होणार. कधी? याची वाट पाहण्यापेक्षा तिच्या तयारीत असणे हेच आपल्या हिताचे आहे. कारण जेव्हा परीक्षा होत नसते तेव्हा गाफील राहण्याची मोठीच शक्यता असते आणि असा गाफिलपणा अंगलट येऊ शकतो.

आलेल्या नव्या वर्षात आपले संकल्प पुन्हा नव्याने आखावे लागतील. आधीच्या प्राधान्यक्रमात काही जुजबी तर काही आमुलाग्र बदल करावे लागतील. ज्या मार्गाने जायचे ते नियोजन, तर काळानुसार त्यात बदल करत मार्गक्रमण करणे ही खरी अंमलबजावणी. आपल्या ध्येयापर्यंत पोहोचताना नियोजन आणि अंमलबजावणी हे दोन्हीही तेवढेच महत्वाचे आहेत. त्यात लवचिकपणा ठेवायलाच हवा.

या अंकापासून आपल्या 'यशाची परिक्रमा' मधील पानांची संख्या वाढवित आहोत. जास्तीत जास्त चालू घडामोडी अंतर्भूत करण्यासाठी ते गरजेचे आहे. चालू घडामोडींवरील सराव प्रश्न या अंकापासून नव्याने समाविष्ट केले आहेत. या बदलाचा तुमच्या अभ्यासाला नक्कीच फायदा होईल.

राज्यसेवा परीक्षेतून तहसीलदारपदी निवड झालेले 'पृथ्वी'चे विद्यार्थी राहुल मोरे यांची यशोगाथा या अंकात समविष्ट केली आहे. ती आपल्याला नक्कीच मार्गदर्शक ठरेल. तुमच्या यशासाठी 'शेर्पा' सदैव तुमच्यासोबत आहे.

आपल्या सूचना व अभिप्राय यांचे सदैव स्वागत आहे.

आपला
**संपादक**

जानेवारी २०२१
# यशाची परिक्रमा
MPSC/UPSC परीक्षांसाठी मासिक

PRITHVI academy

## अनुक्रम

**चालू घडामोडी**

राजकीय व घटनात्मक ...५
जागतिक घडामोडी ...१२
महाराष्ट्र ...३०
आर्थिक घडामोडी ...३६
सामाजिक घडामोडी ...५२
पर्यावरण ...६७
विज्ञान व तंत्रज्ञान ...७४
संरक्षण व अंतरिक्ष ...८२
पुरस्कार व पुस्तके ...९१
क्रीडा घडामोडी ...१००
नेट प्रॅक्टिस ...१०२
दिनविशेष ...१०५

**यशोगाथा**

राहूल विरभान मोरे (तहसिलदार) ...१०६

**विशेष परिक्रमा**

अमेरिकन अध्यक्षीय निवडणूक २०२० ...१०८

**शेर्पा**

पुन्हा नव्याने सुरुवात ...११३

# पुन्हा नव्याने सुरुवात

जुन्या गोष्टी, प्रसंग, घटना हा आपल्या स्मृतीचा हिस्सा होत जातो. जे आत्ता या क्षणाला घडतंय तेच फक्त ताजतवाण असतं. हे माहित असूनही आपण जे घडून गेलेलं आहे त्या आठवणींमध्ये गढून जातो, रममाण होतो. या आठवणी आपल्यासाठी एखादा खजिनाच असतात.

आठवणी एकसारख्या नसतातच. प्रत्येक आठवणीचा आपला असा वेगळा रंग असतो, गंध असतो अगदी आकाराही असतो. किंबहुना हे रंग, गंध, आकार हेच तर आठवणीना जिवंत करतात. ते नसतील तर आठवणीना काहीच अर्थ उरत नाही. यातील काही हसरे असतात तर काही दुखरे. काही हवेहवेसे वाटणारे तर काही नकोनकोसे. जे हवे वाटतात त्यापेक्षा ज्या नको असतात ते क्षणाच प्रकर्षाने समोर येतात. घडून गले, भूतकाळात गेले तरी ते स्वतःला जिवंत ठेवायचा प्रयत्न करतात.

झाडांना पालवी येते. पण त्याआधी पानगळ झालेली असते. ती झाल्याशिवाय नवे अंकुर फुटत नाहीत. मग झाडांना आठवणी नसतात का? त्यांचे भूतकाळाचे क्षण त्यांच्या स्मरणात राहत असतील का? त्या त्या क्षणांचेही हसरे आणि दुखरे असे प्रकार असतीलच ना?

गळून गेलेली पाने एखाद्या झाडाने जाऊ दिलीच नाहीत तर? हिरव्यागार बहरलेल्या झाडाला आलेला बहर त्याने तसाच ठेवायचा म्हटला तर ते जमेल का? असा झालं तर नव्या पालवीला कुठे जागा मिळेल? आधीचीच पाने-फुले झाडावर तशीच राहिली तर नव्याची शक्यताच उरणार नाही.

पण प्रत्यक्षात तसं घडत नाही. नव्या पालवीचे स्वागत झाड जेवढ्या आत्मीयतेने करते त्याच आत्मीयतेने गळून जाणाऱ्या पानापासून ते स्वतःला अलगद वेगळ करते. पानगळीच्या वेळी जर झाड स्वार्थी झालं तर ते स्वतःला विलग नाही करू शकणार. आणि नवी पालवी आलीच नाही तर झाडच अस्तित्वच राहणार नाही. ते वठून जाईल. त्याचा जिवंतपणा संपून जाईल.

स्वतःला जिवंत कसं ठेवायचं हे झाडाला पक्कं ठाऊक असतं. त्याच्यावर असणाऱ्या पाने, फुले, फळे याचं पोषण ते करीत राहत. निसर्गनियमाने त्यांचा येण्याचा जो क्रम असेल तो आनंदाने स्वीकारते. जाण्याचा जो क्रम असेल असेल तोही तेवढाच सहजपणे मान्य करते. कदाचित हेच त्याच्या जिवंतपणाचे गुपित असावे.

पानगळ झालेली निष्पर्ण अवस्था ही गरजेचीच आहे. या निष्पर्ण अवस्थेतच उद्याचा बहार दडलेला असतो. झाडाला अनिभावातून हे पक्कं ठाऊक असत. त्यामुळेच नव्य बहरासाठी पानगळ करायलाही ते तेवढच उत्सुक असतं. कारण त्याला पुन्हा नव्याने सुरुवात करता येते याच्यावर पूर्ण भरवसा असतो.